● शनिवार, दि. १९ ऑक्टोबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ८८ वा ● किंमत २ रुपये ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जेष्ठता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अ‍ॅण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282



जालना शहरातील प्रतिष्ठित अशा भाग्यनगर परिसरात मोठ्या प्रमाणात कचरा साचला आहे. हा कचरा उचलण्यास शहर महानगर पालिकेकडुन दिरंगाई होत असल्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली आहे. नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. ( छाया -किरण खानापूरे )

## राज्यातील संघर्ष योद्ध्यांचा उद्या सत्कार

**जालना । प्रतिनिधी -** ब्राह्मण समाजासाठी भगवान परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापनेचा ऐतिहासिक निर्णय महायुती सरकारने घेतलाआहे. हे महामंडळ मिळावे म्हणून अहोरात्र परिश्रम करणारे संघर्षयोद्धे यांचा सन्मान करणे हे कर्तव्य समजून स्व. विलास नाईक प्रतिष्ठान, जालना यांनी सत्कार समारंभ आयोजित केला आहे.जुना जालना भागातील स्वयंवर मंगल कार्यालयात रविवार, दि.२०ऑक्टोबर रोजी सायंकाळी सहा वाजता या सोहळ्याचे आयोजनआल्याची माहिती प्रतिष्ठानच्या अध्यक्षा भारती विलास नाईक, श्रेया विलास नाईक यांनी दिली.

या सोहळयात प्रामुख्याने सत्का रमूर्ती - संघर्षयोद्धे म्हणून पद्‍देवा जोशी-पालमकर (पालम,परभणी), अविनाश जोशी (पालम,परभणी), बाजीराव धर्माधिकारी(परळी, बीड), विश्वजीत देशपांडे(पुणे), सचिन वाडे पाटील(छत्रपती संभाजीनगर), केदार पाटील (छत्रपती संभाजीनगर),प्रसाद खारकर (सेलू, परभणी),निखिल लातूरकर (नांदेड), अनिल मुळे (छत्रपती संभाजीनगर),सुरेश देशपांडे (छत्रपतीसंभाजीनगर), आर. बी. शर्मा(छत्रपती संभाजीनगर), विलासअकोलकर (छत्रपती संभाजीनगर), उमेश जोशी (परम णी), दीपक रणनवरे (जालना), सुरेश मुळे(जालना), विजया कुलकर्णी (छत्रपती संभाजीनगर), विजयाअवस्थी (छत्रपती संभाजीनगर),शाम कुलकर्णी (गंगाखेड,परभणी), प्रकाश केदारे (पाथरी,परभणी), डॉ. संजय सुपेकर(गंगाखेड, परभणी), शैलेश कुलकर्णी (अंबेजोगाई, बीड), वसंत किनगावकर (छत्रपती संभाजीनगर), लक्ष्मीकांत दडके(पाथरी, परभणी), संतोष कुलकर्णी (परभणी), ड. प्रसाद देशमुख (बीड), भानुदास शौचे (नाशिक),मनोज जोशी,स्वप्नील पिंगळकर, श्रीधर जोशी,राजेंद्र पोतदार,अनिल डोईफोडे,गजानन जोशी यांचा गौरब होणार आहे. सोहळ्यासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन प्रतिष्ठानच्या अध्यक्षा भारती नाईक

### हिंदुत्ववादी श्रीकांत पांगारकर यांच्यावर शिवसेना
## जालना विधानसभा प्रमुखपदाची जवाबदारी



**जालना । प्रतिनिधी -** कट्टर हिंदुत्ववादी असलेले श्रीकांत पांगारकर यांच्यावर शिवसेना (शिंदे गट) यांच्यावर जालना विधानसभा प्रमुखपदाची जवाबदारी देण्यात आली आहे. माजी राज्यमंत्री तथा शिवसेना उपनेते अर्जुनराव खोतकर यांनी त्यांची नियुक्ती केली आहे.

दिलेल्या नियुक्ती पत्रात म्हटले आहे की, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे व धर्मवीर आनंद दिघे यांच्या आर्शिवादने महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाने व शिवसेना उपनेते अर्जुनराव खोतकर यांच्या आदेशाने जालना विधानसभा प्रमुखपदी नियुक्ती करण्यात येत आहे.

शिवसेना, किसानसेना व युवासेना संघटन वाढीसाठी तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विचार तळागाळापर्यंत पोहचवुन पक्ष हिताचे काम पुढील काळात आपण कराल या अपेक्षेने ही नियुक्ती करण्यात येत आहे. माजी राज्यमंत्री तथा शिवसेनेचे उपनेते अर्जुनराव खोतकर यांनी श्रीकांत पांगारकर यांचे यावेळी पक्षात स्वागत करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी महेश बुलगे यांच्यासह श्रीकांत पांगारकर यांचे निकटवर्तीयांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्त्वात सर्व समाज घटकाला न्याय
## सुवर्ण अक्षराने लिहिण्यासारखा कालखंड - खोतकर

**जालना । प्रतिनिधी -** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्त्वात तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार व देवेंद्र फडणवीस यांच्या महायुती सरकारने सर्व समाजघटकाला न्याय देण्याचा पुरेपुर प्रयत्न केला आहे. गेली अडीच वर्षात महिला सशक्तीकरण, शेतकरी, युवा, ज्येष्ठ नागरिक, रोजगार, आरोग्य, उद्योगधंदे, पायाभुत सुविधा, ग्रामणी विकास, सांस्कृतिक, क्रीडा आदी सर्व आघाड्यावर सरकाने भरिव कामगिरी केली असून सरकारचा हा कालखंडा सुवर्ण अक्षराने लिहिण्यासारखा असल्याचे माजी राज्यमंत्री तथा शिवसेनेचे उपनेते यांनी येथे म्हटले आहे.

भाग्यनगर येथील त्यांच्या निवासस्थानी शुक्रवार (दि १८) रोजी आयोजित पत्रकार परिषदेते ते बोलत होते. यावेळी अरविंद चव्हाण, ब्रह्मानंद चव्हाण, भाऊसाहेब घुगे यांची प्रमुख उपस्थिती होती

शिवसेनेचे उपनेते खोतकर म्हणाले की, नुकतीच आर्दश आचारसंहिता लागू झाली असून महायुती सरकारने मुंबईत पत्रकार परिषद घेऊन राज्य सरकारने केलेली कामे जनतेसमोर ठेवली आहेत. जिल्ह्याभरात अशाच पद्धतीने पत्रकार परिषदा घेत जनतेला केलेली कामे अवगत करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्याच अनुषंगाने आजची पत्रकार परिषद आयोजत करण्यात आल्याचेही श्री खोतकर म्हणाले. गेल्या अडीच वर्षात या सरकारने महिला सशक्तीकरणासाठी मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेच्या माध्यमातून अडीच कोटी महिलांना दरमहा १५०० रुपये देण्यात येत आहे. लेक लाडकी योजनेच्या माध्यमातून गरीब कुटुबांतील नवजात मुलीला १.०१ लाख हफ्त्यांमध्ये खात्यावर जमा केले जात आहेत. मुलींना उच्च शिक्षणाची मोफत सोय करण्यात आली आहे.

शेतकऱ्यासाठी नमो शेतकरी महासन्मान योजनेत प्रत्येक शेतकऱ्यांना १२ हजार रुपये दरवर्षी देण्यात येत आहेत. याचा ९२.४३ लाख शेतकऱ्यांना फायदा होत आहे. एक रुपयात पिक विमा दिला जातो आहे. मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना राबविणयत येत असून यात ४४ लाख शेतकऱ्यांना १४, ७६१ कोटींच्या अनुदानासह मोफत वीज दिली जात आहे. युवकांसाठी मुख्यमंत्री लाडका भाऊ योजना अंमलात आणली. यात दरमहा ६००० हजार, दहा हजार रुपयांचे स्टायपंड विद्यार्थ्यांना दिले जात आहेत. सारथी, महाज्योती, बार्टी याचा विद्यार्थ्यांना लाभ होत आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या ४.६२ लाख विद्यार्थ्यांना १,२१८ कोटी रुपयांची शिष्यवृत्ती देण्यात येत आहे.

मागील दोन वर्षात ७५ हजार सरकारी भरती करण्यात आली आहे. युनिफाईड पेन्शन योजना लागू करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. अंगणवाडी सेविकांच्या मानधनात १५०० रुपयांची वाढ या सरकारने केली असून आशा वर्कर्सच्या मानधनात ५ हजारांची वाढ तर कृषि सेवक याचे मानधन ६ हजार, ग्राम रोजगार सेवक ८००० हजार मानधन करण्यात आल्याची माहितीही श्री खोतकर यांनी यावेळी दिली यासह ज्येष्ठ नागरिकांसाठी पेन्शन योजना, मुख्यमंत्री वयोश्री योजना, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ, दिव्यांग कल्याण विभाग, मोफत आरोग्य तपासणी महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेच्या विमा संरक्षणात वाढ करण्याचे काम या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्त्वातील महायुती सरकारने केले आहे. त्याच बरोबर उद्योगधंयात थेट परकिय गुंतवणूक, दावोस परिषद, वस्त्र धोरण, हरति हायड्रोजन धोरण, सेमीकंडक्टर धोरण, शहरी पायाभुत सुविधा, ग्रामीण विकास, क्रिडा सह मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्यासह सांस्कृतिक वारसा जपणारी समाज हितांची अनेक कामे या सरकारने केली आहेत. विरोधक केवळ खोटं नरेटीव्ह पसरवत आहेत. मात्र, मुख्यमंत्र्यांच्या बहिणींची खाते खोटं बोलणार नाहीत, आकडेवारी खोटं बोलणार नाही, या सरकारने जे निर्णय घेतले त्यात कोणताही बदल होणार नसल्याचेळी श्री खोतकर यावेळी म्हणाले.

अरविंद चव्हाण यांनी महिलांमध्ये महायुती सरकारबद्दल आदर निर्माण झाला असल्याचे सांगून अर्जुनराव खोतकरांनी सांगितलेल्या सरकारच्या कामांना आपल्या माध्यमातून जनतेपर्यंत पोहचवा असे आवाहन चव्हाण यांनी पत्रकारांना केले.



ब्रह्मानंद चव्हाण यांनी सरकारने शेवट्या घटकांपर्यंत पोहचून तळागाळातील सर्व समान्यांचा विकास केला. हे सरकार गरिबांचे सरकार आहे. आश्रम शाळेचा प्रश्न या सरकारने सोडवला असून या सरकारने सर्व समाजघटकांला न्याय देण्याचे काम केले असून आम्ही या सरकारचे घटकपक्ष असून या सरकारने केलेले काम तळागाळापर्यंत पोहचविण्याचे काम करत राहणार असल्याचे श्री चव्हाण यावेळी म्हणाले.

### परवाना धारकांना शस्त्रास्त्रे बाळगण्यास निर्बंध;
## शस्त्रे जमा करण्याच्या सूचना

**जालना । प्रतिनिधी -** भारत निवडणुक आयोगाच्या सुचनानुसार जालना जिल्ह्यामध्ये विधानसभा सार्वत्रिक निवडणुक-२०२४ चा निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केलेला आहे. जालना जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातुन निवडणुक घोषित झाल्यापासुन निवडणुक निकाल घोषित होईपर्यत, परवाना दिलेले शस्त्रास्त्रे वाहुन नेण्यावर व बाळगण्यास निर्बंध लागू करण्यात येत आहेत. तरी असे आदेश जिल्हादंडाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी जारी केले आहेत.
भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये शासकीय कर्तव्य पार पाडणाऱ्या व्यक्ती, दंडाधिकारी शक्ती प्रदान केलेले अधिकारी, पोलिस अधिकारी-कर्मचारी, बँकेच्या सुरक्षा व्यवस्थेवरील अधिकारी-कर्मचारी तसेच सराफा यांच्या व्यतिरिक्त तसेच मा. उच्च न्यायालयातील जुन्या रिट पिटीशन २००९/२०१४ च्या आदेशास अधीन राहुन इतर सर्व परवानाधारक व्यक्तींनी परवाना दिलेले शस्त्रास्त्रे वाहुन नेण्यावर व बाळगण्यास आदेशान्वये बंदी घालण्यात आली आहे. शस्त्र परवानाधारकांनी आपले शस्त्र जवळच्या पोलिस ठाण्यात जमा करावेत. निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर एका आठवड्याचे आत संबधितांचे शस्त्रे परत करण्यात यावेत. असेही आदेशात नमुद करण्यात आले आहे.

# संपादकीय

## तंत्रज्ञानाचा दुरुपयोग

सध्याचे युग हे तंत्रज्ञानाचे युग आहे. तंत्रज्ञानाचा वापर चांगल्या कामासाठी केला पाहिजे मात्र काही महाभाग या तंत्रज्ञानाचा दुरुपयोग करून समाजातील प्रतिष्ठित लोकांची विशेषतः सेलिब्रेटींची बदनामी करत आहे. सध्या फेसबुक, इंस्टाग्राम यासारख्या सोशल मीडिया साईटवर सेलिब्रिटींचे त्यातही हिंदी आणि मनोरंजन सृष्टीतील अभिनेत्रींचे मॉर्फ केलेल्या अश्लील छायाचित्रांचा आणि व्हिडिओचा पूर आला आहे. हे छायाचित्र पाहिले की असे वाटते की हे छायाचित्र त्या अभिनेत्रींनीच काढून सोशल मीडियावर टाकले आहेत मात्र नीट पाहिले की लक्षात येते की हे छायाचित्र मोर्फ केलेले आहे. मागील वर्षी बॉलिवूडची लोकप्रिय अभिनेत्री असलेली रश्मीका मंधना हीचा डीपफ ेक व्हिडिओ प्रसार माध्यमात व्हायरल करण्यात आला होता. सोशल मीडियावर हा व्हिडिओ व्हायरल झाल्यावर कला क्षेत्रात चांगलीच खळबळ माजली होती. हा व्हिडीओ व्हायरल झाल्यावर स्वतः अभिनेत्री रश्मीका हिने हा व्हिडिओ तिचा नसल्याचे सांगून व्हिडिओ व्हायरल झाल्यापासून तिला मोठा मनस्ताप सहन करावा लागत असल्याचे सांगितले होते. हा व्हिडिओ व्हायरल झाल्यावर बिग बी अमिताभ बच्चन यांनीही संताप व्यक्त केला होता. सोशल मीडियावर व्हायरल झालेला व्हिडिओ हा एका दुसऱ्याच मुलीचा होता. मात्र एडिटिंग करून त्या मुलीच्या चेहरा लपवून त्याजागी अभिनेत्री रश्मीका मंधनाचा चेहरा लावण्यात आला होता. हा व्हिडिओ व्हायरल झाल्यावर पोलीसातही तक्रार दाखल झाली होती तेंव्हा वाटले होते की या प्रकाराला आळा बसेल मात्र आळा बसणे तर दूरच उलट हा प्रकार वाढतच चालला असून सध्या तर अशा मॉर्फ केलेल्या छायाचित्रांचा आणि व्हिडिओजचा महापूर आला आहे. हे व्हिडिओ एडिटिंग करताना एआय या नव्या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येतो. एआयच्या मदतीने व्हिडिओ आणि फोटो एडिट करून लोकांना त्रास दिला जातो. तंत्रज्ञानाने मानवी जीवनात क्रांती केली आहे. विज्ञानाच्या मदतीने दररोज नवे तंत्रज्ञान उदयास येत आहे. या तंत्रज्ञानाचा वापर मानवी कल्याणासाठी केला पाहिजे. विज्ञान तंत्रज्ञानाचा हेतू मानवी कल्याण हेच आहे मात्र काही नतद्रष्ट लोक या तंत्रज्ञानाचा उपयोग मानवी कल्याणासाठी नाही तर समाज विघातक कार्यासाठी करतात हा प्रकार त्यातलाच आहे. वास्तविक कोणाचाही फेक व्हिडिओ किंवा छायाचित्र बनवून बदनामी करणे हा गुन्हा आहे. अशा समाज विघातक लोकांना कायद्याने कडक शिक्षा व्हायलाच हवी. तंत्रज्ञानाचा दुरुपयोग ही नवीच समस्या आता निर्माण झाली आहे.



**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

### पान १ वरुन

## राज्यातील संघर्ष ...

यांनी केले आहे. या सोहळ्यासाठी आशीर्वाद देण्यासाठी भास्कर महाराज देशपांडे (नवनाथ संस्थान, जाफराबाद), विश्वास महाराज गोंदिकर (प्रसिद्ध भागवतकार, जालना), राम दास महाराजआचार्य (श्रीराम मंदिर संस्थान, जालना), यांची उपस्थिती राहणार आहे. तर माजी मंत्री रावसाहेब दानवे, आ. कैलास गोरंट्याल, माजी मंत्री अर्जुन खोतकर, आ.बबनराव लोणीकर, आ.राजेश टोपे, माजी आ. अरविंद चव्हाण,भाजपा विधानसभा प्रमुख भास्कर दानवे, शिवसेना जिल्हाप्रमुख भास्कर अंबेकर, ए.जे.बोराडे, भाजपा महानगरअध्यक्ष अशोक पांगारकर, माजी उपनगराध्यक्ष राजेशराऊत, प्रसिद्ध उद्योजक घनश्याम गोयल, राहुल अग्रवाल,डॉ.संजय राख, डॉ. माधव अंबेकर यांच्यासह मान्यवरांचीउपस्थिती राहणार आहे.

# सायबर गुन्ह्यांचे प्रकार; फिशिंग व त्या बाबत घ्यावयाची दक्षता

फिशींग मध्ये हॅकर आपल्या बँकींग, डेबीट किंवा क्रेडीट कार्डचे आयडी पासवर्ड ची माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी आपल्याला मॅसेज किंवा ईमेल पाठवितात.

फिशिंगमध्ये आपले सोशल मिडीया, बँकिंग व कार्डचे डिटेल्स मिळवण्याचा प्रयत्न केला जातो.

फिशिंगमध्ये फोनवरुन आपली संवेदनशिल माहिती विचारण्यात येते.

मुळ संकेत स्थळासारखे दिसणारे बनावट संकेतस्थळ बनवुन ग्राहकांना फसवुन त्यांची संवेदनशील माहिती चोरण्यात येते.

इ-मेल किंवा फोन मेसेज वरुन बनावट वेबलिंक पाठवुन आपली माहिती चोरली जाऊ शकते.

फिशींग बाबत घ्यावयाची दक्षता

:// ने सुरुवात होणाऱ्या सुरक्षित संकेतस्थळाचा वापर करा.

कोणत्याही अनोळखी व्यक्ती किंवा कंपनीकडुन आलेल्या इमेलवर क्लिक करु नका अथवा त्यांना माहिती पुरवु नका.

अनोळखी व्यक्तीने मोबाईलवर पाठविलेल्या कोणत्याही लिक्स उघडु नका त्या लगेच डिलीट करा.

हॅकिंग व त्या बाबत घ्यावयाची दक्षता

हॅकिंग म्हणजे एखाद्या सिस्टम मधील चुका किंवा त्रुट्या शोधुन समोरच्या व्यक्तिच्या परवानगी शिवाय त्या मध्ये प्रवेश करणे आणि माहिती प्राप्त करणे.

हॅकिंगमध्ये आपल्या अकाऊंटची संवेनशिल माहिती वापरुन आपल्या अकाऊंटचे नियंत्रण मिळवले जाते.

हॅकिंगमध्ये कोणत्याही सॉफ्टवेअरची मुळ कार्यपध्दती बदलुन त्याचा वाईट हेतुसाठी वापर केला जातो.

घ्यावयाची दक्षता आणि उपाय योजना

पासवर्ड हा ८ अक्षरांचा असावा त्यात , , , (. १२३) चा समावेश असावा व तो कोणालाही सांगु नये अथवा कोठेही लिहुन ठेवु नये.

नियमित वापरण्यात येणारे वेब ब्राऊजर ( , , ) नेहमी अद्यावत करा, त्यांनी वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे पालन करा.

संगणकावरील कडे वेळोवेळी लक्ष ठेवा, आक्षेपार्ह आढळल्यास तो करा.

संगणकाकरीता वैयक्तिक फायरवॉल अद्यावत करुन घ्या.

आपल्या संकणकाची सेटींग्ज व डेटा यांचा नियमीतपणे बॅकअप घ्या.

संगणक, लॅपटॉप व त्यावरील आपला डेटा सुरक्षीत करण्यासाठी उच्च प्रतीचा - चा वापर करा.

नोकरीचे आमिष दाखवुन होणारी फसवणुक

जॉब स्कॅममध्ये नेमणुक / निवड अधिकारी असल्याचे सांगुन आकर्षक फायद्याच्या नोकरीचे आमिष आपल्याला दाखवले जाते, त्यासाठी आगाऊ पैशाची मागणी केली जाते. पैसे मि ळाल्यावर मात्र पुर्णपणे संपर्क तोडुन फसवणुक केली जाते.

यामध्ये नामांकित कंपनीच्या बनावट इ-मेल आयडी व वेबसाईटचा वापर केला जातो.

घ्यावयाची दक्षता

इंटरनेटवरील नोकरी संदर्भात विशेषत: विदेशातील नोकरी संधीच्या जाहिरातींची खात्री करा, त्यांना आपली कोणतीही वैयक्तिक माहिती देऊ नका आणि आर्थीक व्यवहार करु नका.

विवाहविषयक संकेतस्थळावरुन होणारी फसवणुक

विवाह विषयक संकेत स्थळावर फसवणुकीच्या उद्देशाने गुन्हेगार खोट्या आकर्षक प्रोफाईल बनवतात.

लग्न करण्याचे आमिष दाखवुन त्या व्यक्तीची जवळीक साधली जाते. या अनोळखीचा फायदा घेऊन त्या व्यक्तीची खाजगी माहिती व फोटो मिळवुन ते प्रसारित करण्याची भिती घालुन आर्थीक फसवणुक केली जाते.

पीडीत व्यक्तीकडुन पैशांची मागणी केली जाते, एखादी कृती करण्यास भाग पाडले जाते.

घ्यावयाची दक्षता

विवाह विषयक संकेत स्थळावर समक्ष अथवा खात्रीशिर पध्दतीने पडताळणी केल्याशिवाय



वैयक्तिक कोणतेही फोटो, बँक विषयक माहिती देऊ नये, तसेच खात्री झाल्याशिवाय कोणतेही पैशांचे व्यवहार करु नये.

वैयक्तीक ओळख चोरुन फसवणुक

जेव्हा कोणी आपली वैयक्तिक ओळख माहिती (उदा. नाव, पत्ता, आयडी नंबर बँकीग खाते क्रमांक, युझरनेम किंवा पासवर्ड फसवणुक करण्यासाठी वापरतात त्यास असे म्हणतात. गुन्हेगार हा ईमेल, मॅसेज किंवा फोनव्दारे व्यक्तीची वैयक्तीक ओळख चोरी करतो.

अशा माहितीचा वापर करुन बँकिंग व्यवहार किंवा सोशल मिडीयावर त्या व्यैक्तीची ओळख धारण करुन फसवणुक केली जाते.

पिडीत व्यक्तीच्या नातेवाईकांना संपर्क साधुन त्यांची आर्थीक फसवणुक केली जाते.

घ्यावयाची दक्षता

संगणक, मोबाईलवर विविध साईटस व ॲप्लिकेशनचा वापर केल्यानंतर आठवणीने लॉग आऊट करा.

आपला इमेल-आयडी हा पासवर्ड सोबतच ब्राऊजला करणे टाळा.

इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा पासवर्ड वेळोवेळी बदला तो ओळखण्या इतपत सोपा ठेवु नका.

बँक विषयक फसवणुक

सामान्यत: मी बँक अधिकारी बोलत आहे असं सांगुन ग्राहकाकडुन तुमचे खाते बंद होईल किंवा /क्रेडीट कार्ड ब्लॉक होईल अशी भिती घालुन त्याच्या बँक खात्यासंबंधी किंवा /क्रेडिट कार्डची संवेदनशिल माहिती विचारण्यात येते.

कोणतीही बँक कोणत्याही ग्राहाकचे बँक खाते आणि /क्रेडिट विषयक माहिती (१६ अंकी क्रमांक, पिन, पासवर्ड नंबर, एक्सपायरी दिनांक) विचारत नाही.

घ्यावयाची दक्षता

क्रेडीट / डेबिट कार्डसंबंधीची माहिती सांगु नये (१६ अंकी क्रमांक, पिन, पासवर्ड नंबर, एक्सपायरी दिनांक)

आपणास बँकेकडुन येणारे संदेश काळजीपुर्वक वाचावेत. आपणास संदेशाव्दारे पाठवलेली कोणतीही माहिती देऊ नये.

विशेषत : नंबर कोणालाही देऊ नये. बँकेने पाठवलेल्या मेसेजबद्दल शंका असल्यास बँकेशी संपर्क साधावा.

विविध ईमेल, सोशल मिडीया, नेट बँकींग किंवा इतर ऑनलाईन व्यवहारासाठी कधीही एकच पासवर्ड वापरु नका.

मोबाईल स्मार्टफोनला देखील पासवर्ड ठेवा, बँक संदर्भातील किंवा इतर महत्वाची माहिती मोबाईलमध्ये करु नका.

लॉटरी / बक्षीस लागल्याचे ईमेल / कॉल / एसएमएस असल्यास त्यांच्या कोणत्याही भुलभापांना बळी पडु नका.

संबंधी फसवणुक

मशीनवर व्यवहार करताना तेथील चे व्यवस्थित निरीक्षण करा.

मशिनवर कार्ड स्किमर लाऊन आपल्या कार्डची माहिती केली जाऊ शकते, सदर माहितीचा उपयोग बनावट कार्ड बनविण्यासाठी केला जातो.

आपण कि-पॅडवर पिन टाकण्याआधी तिथे कॅम ेरा किंवा रेकॉर्डर नसल्या बाबत खात्री करावी.

कोणत्याही अनोळखी व्यक्तीस व्यवहार करीत असताना रुममध्ये प्रवेश देऊ नये.

काही संशयास्पद आढळुन आल्यास संबंधीत बँकेशी संपर्क करा.

घ्यावयाची दक्षता

चा वापर करतांना सेंटरची पाहणी करा, संशयास्पद आढळल्यास तेथे पुढील व्यवहार करणे टाळा किंवा जवळचे पोलीस ठाणेला माहिती कळवावी.

विमा विषयक फसवणुक

तुमची विमा पॉलिसी बंद झाली आहे का, तुम चे थकीत प्रिमियम हया अकाऊंटवर पाठवा.

तुम्ही विमा पॉलिसी घ्या त्यावर मोठया रक्कमेचे कर्ज मिळवुन देऊ.

अशा प्रकारचे फोन कॉल हे तुमची फसवणुक करण्या करीता येऊ शकतात, असे फोन आल्यास कोणतीही माहिती अथवा कोणतीही रक्कम देण्याआधी आपल्या विमा कंपनीच्या कार्यालयात जाऊन खात्री करावी.

समाज माध्यमाव्दारे होणारे गुन्हे

सोशल मिडीयावर येणाऱ्या लिंकमध्ये व्हायरस असु शकतो.

सोशल मिडीयावर बनावट खोट्या बनवुन व्यक्तीची बदनामी केली जाते.

सोशल प्रोफाईलवरील वैयक्तीक माहितीवरुन आपले इतर अकाऊंटस पासवर्ड शोधण्याचा प्रयत्न केला जातो.

अशा वैयक्तीक माहितीचा आधार घेऊन बँकेचे व्यवहार केले जाऊ शकतात.

सोशल मिडीयावरील पोस्ट करण्यात येणाऱ्या माहितीचा आधार घेऊन सायबर गुन्हेगार त्यांच्या जाळयात फसवतात.

घ्यावयाची दक्षता

विविध समाज माध्यमांतुन धार्मिक भावना भडकवणारे संदेश, व्हिडीओ, छायाचित्रे किंवा अश्लिल साहित्य पोस्ट करुन नका अथवा फॉरवर्ड, लाईक व शेअर करु नका.

संपुर्णपणे खात्री पटल्याशिवाय अनोळखी व्यक्तींची , , , सारख्या विविध सोशल मिडिया प्लॅटफॉर्मवर अनोळखी व्यक्तीची स्वीकारु नका.

ऑनलाईन खरेदी विषयक फसवणुक

खऱ्या संकेत स्थळासारखे हुबेहुब दिसणारे खोटे संकेतस्थळ बनवुन लोकांना फसवले जाते. तसेच खऱ्या संकेत स्थळावर सवलतीचे आमिष दाखवणारे बनावट जाहीराती टाकुन फसवणुक केली जाते.

घ्यावयाची दक्षता

ऑनलाईन शॉपिंग करतांना सुरक्षित (://) संकेत स्थळांचाच वापर करा.

खरेदी करण्यापुर्वी त्या संकेत स्थळाची सत्यता पडताळुन पाहावी.

इलेक्ट्रीक बिला संबंधी येणाऱ्या फसवणुक संदेश

महावितरणच्या नावाने बनावट / व्दारे विज बिल भरणा संदर्भात मेसेज पाठवुन आपण बिल भरलेले नाही, नमुद वेळेत बिल न भरल्यास आपले वीज कनेक्शन बंद करण्यात येईल असे बनावट मेसेज सायबर गुन्हेगार पाठवुन आर्थीक फसवणुक करत असतात.

घ्यावयाची दक्षता

वरील आलेल्या मेसेजला प्रतिसाद देऊ नये. कोणतीही लिंक ओपन करुन त्या बाबत आलेला किंवा वैयक्तीक माहिती शेअर करु नये, पैसे पाठवु नये किंवा कोणत्याही प्रकारचे ॲप ( , , , , , ) डाउनलोड करु नये.

अनोळखी व्यक्तीच्या व्हिडीओ कॉलला प्रतिसाद देऊ नये ()

सोशल मिडीया , , यावरील जाहिरातींना भुलुन काही नागरीक मनमोकळया गप्पा करण्यासाठी अनोळखी तरणीं / महिलांना व्हिडीओ कॉल करुन चॅटींग करतात. नंतर या व्हिडीओ कॉलला एडीट करुन अश्लिल व्हिडीओ बनवुन तो व्हिडीओ सोशल मि डीयावर प्रसारित करण्याची धमकी देत खंडणी मागितली जाते. काही नागरीक आपली माहिती सोशल मिडीयावर प्रसारीत होउन आपली बदनामी होईल या भितीने ऑनलाईन पैसे पाठवितात व बळी पडतात.

घ्यावयाची दक्षता

अनोळखी व्यक्तीच्या व्हिडीओ कॉलला प्रतिसाद देऊ नये, सोशल मिडीयावर असा प्रकार घडल्यास तात्काळ पोलीस ठाणे सायबर येथे तक्रार करावी.

सायबर हेल्प लाईन

ॲड. अरविंद एस. मुरमे
प्रसिध्दी प्रमुख जिल्हा वकील संघ जालना

# इस्रायल - पॅलेस्टाइन रक्तरंजित संघर्ष

इस्राईल आणि पॅलेस्टाइन यांच्यात सुरू असलेला रक्तरंजित संघर्ष आणखी तीव्र झाला आहे. या युद्धात आता लेबनॉन आणि इराणनेही उडी घेतली आहे. इस्राईलने लेबनॉनवर तर इराणने इस्राईलवर हल्ला केला आहे. इराणने इस्राईलवर २०० हून अधिक क्षेपणास्त्रांचा मारा केला याला प्रतिउत्तर म्हणून इस्राईलने पुन्हा लेबनॉनवर हल्ला करतानाच इराणला देखील बदला घेण्याचा इशारा दिला. इराण आणि पॅलेस्टाईन यांच्यातील संघर्ष वर्षभरानंतरही चालूच आहे. गेले वर्षभर या दोन देशात युद्ध सुरू आहे. पॅलेस्टाईनच्या हमास या दहशतवादी संघटनेने इस्राईल मध्ये घुसून हल्ला केल्यावर इस्राईलने पॅलेस्टाईनच्या गाझा पट्टीवर हल्ला करून ती अक्षरशः जम ीनदोस्त केली. या युद्धात हजारो नागरिक मारले गेले असून लाखो जखमी आहेत तरीही हा संघर्ष सुरूच आहे. इस्राईल पॅलेस्टाईन आणि लेबनॉनवर हल्ले करतच आहे. इस्राईल पॅलेस्टाईन आणि लेबनॉनच्या केवळ लष्करी किंवा दहशतवादी तळांवर हल्ले करीत नसून नागरी वस्तीवर देखील हल्ला करीत आहे. पॅलेस्टाईनच्या हमास संघटनेने देखील इस्राईलवर जो हल्ला केला होता त्यात शेकडो नागरिकांना जीव गमवावा लागला होता. पॅलेस्टाईनने अपहरण केलेल्या शेकडो इस्राईली नागरिकांना अद्यापही सोडले नाही. हा संघर्ष कमी होण्याऐवजी वाढतच चालला आहे नव्हे तो तीव्र होत चालला आहे. अर्थात हा संघर्ष आताचा नाही तर काही दशकांचा आहे. इस्राईल - पॅलेस्टाइन हा संघर्ष पुन्हा उफाळून येण्यामागे धार्मिक वाद कारणीभूत आहे. जेरुसलेम हे अत्यंत प्राचीन शहर आहे. या शहरात यहुदी, ख्रिश्चन आणि मुस्लिम या तिन्ही धर्माच्या पवित्र धार्मिक स्थळांचा मिलाफ आहे. साहजिकच या ठिकाणी कोणताही धार्मिक वाद निर्माण झाला तर जगातील निम्म्याहून अधिक देशांवर याचा प्रभाव पडतो. जेरुसलेम या शहराची स्थापना ख्रिश्चन आणि मुस्लिम धर्माच्या उदयापूर्वी झाली आहे. ई स पूर्व ९३७ मध्ये यहुदी राजा सुलेमानने येथे भव्य सिनेगॉग ( यहूदिंचे पवित्र धार्मिक स्थळ ) बांधले. कालांतराने या भागावर परकीय आक्रमणे झाली. अनेक धार्मिक क्रांत्या झाल्या आणि त्यांनी सिनेगॉग च्या ठिकाणी आपल्या धर्माची प्रार्थना स्थळे उभारली. मूलनिवासी यहूदिंना तेथून हुसकावून लावले. यहुदी लोक आपली संपत्ती घरदार सोडून जगभरात मिळेल त्या ठिकाणी राहू लागले. या काळात पवित्र सिनेगॉगही नष्ट करण्यात आला. सध्या त्याची केवळ एक भिंत शिल्लक आहे तिला वेलींग वेल असे म्हणतात. यहुदी लोक तिला अत्यंत पवित्र मानतात. या भिंतीच्या पूर्व दिशेला अल अकसा मशीद आहे. मक्का आणि मदिना प्रमाणेच मुस्लिम लोक या मशिदीला पवित्र मानतात. तर याच शहरात चर्च ऑफ होली स्कप्लचर हे ख्रिश्चन लोकांचे पवित्र स्थान आहे. याच शहरात रोमन सम्राटाने प्रभू येशू ख्रिस्ताला सुळावर चढवले होते. त्यामुळे हे शहर या तिन्ही प्रमुख धर्मासाठी अत्यंत पवित्र असे शहर आहे. त्यामुळे जेरुसलेम वर अधिपत्य स्थापन करणे हा तिन्ही धर्मीयांसाठी प्रतिष्ठेचा मुद्दा बनला आहे. जेरुसलेमला इस्रायलपासून मुक्त करून तिथे पॅलेस्टाइन राष्ट्र निर्माण करणे हे या संघटनेचे ध्येय आहे. तर हमास ही दहशतवादी संघटना असून तिला आमच्या देशात जागा नाही जर हमासने आमची खोड काढली तर त्याला जशास तसे उत्तर दिले जाईल असे इस्रायलचे धोरण आहे त्यामुळेच कित्येक दशके हा संघर्ष सुरु आहे. यावेळी मात्र या संघर्षाने उग्र स्वरूप धारण केले आहे हा संघर्ष जर लवकर मिटला नाही तर त्याची मोठी किंमत जगाला मोजावी लागेल.

# विधानसभेचा आधारस्तंभ; जरांगे पाटील?

जरांगे पाटील हे व्यक्तिमत्व म्हणजे सर्व सामान्य घरातील सामान्य माणूस जेव्हा मराठा आरक्षणासाठी स्वतः चा जीव पणाला लावून आमरण उपोषणाचे हत्यार उपसून सरकारला जेरीस आणतो त्यांच्यामागे लाखो म राठा समाज एकजुटीने उभा राहतो ह्याचे मुख्य कारण जरांगे पाटील हे कोणाच्याही आमिषाला बळी पडणारे नाहीत,स्वच्छ चारित्र्य,उदात्त विचार,समाजाला




न्याय मिळवून देण्याची अंतर्गत उर्मी,समाजाच्या हितासाठी कोणालाही राजकीय दृष्ट्या धमकावण्याची बौद्धिक क्षमता ह्या त्यांच्या ठासून भरलेल्या गुणांमुळे अजून मराठा समाजाला न्याय मिळाला नसला तरी तो मिळवून दिल्याशिवाय शांत बसणार नाही हि त्यांची ठाम भूमिका आणि त्याच बरोबर महाराष्ट्रात विधान सभेच्या निवडणूक जाहीर झाल्यामुळे मराठा मते आपल्याला मिळावीत ह्यासाठी राजकीय पक्षाचे अहंकारी नेते मतांची बेगमी करण्यासाठी आणि मराठा समाजाचा आपल्याला धक्का बसू नये म्हणून झोपेचे खोबरे करून रात्री तीन वाजता सुद्धा त्यांचा दरवाजा खटकटवतात हेच जरांगे पाटीलांचे यश असले तरी जरांगे पाटील यांनी आपला सय्यम कुठे सुटू दिला नाही आणि कोणाला मतलबासाठी मदतीचा हातही देणार नाही

प्रामाणिक बुद्धिमान जरांगे पाटील हे महाराष्ट्राचे राजकारण कसेही फिरवू शकतात.स्वतःचे उमेदवार उभे केल्यास भले भले दिग्गज नेते धाराशायी पडतील यात शंका नाही.मराठा आरक्षणासाठी उमेदवार दिले तर विधानसभेत त्याचा प्रभाव पडू शकतो.हि विधानसभा निवडणूक कोणत्याही पक्षाला वाटते तितकी सोपी नाही.शत प्रतिशतवाल्या भाजपने हरियाणा स्टाईल वापरली तर काहीही होऊ शकते.मतदार कोणत्याही आमिषाला बळी पडले नाही तर आता खरी कसोटी हि मतदारांची आहे.मतदारांनी महाराष्ट्राच्या हिताचा, उत्कर्षाचा प्रतिष्टेचा,संस्कृतीचा विचार करता पक्ष न बघता योग्य उमेदवाराला मतदान करणे गरजेचे आहे .

**यशवंत चव्हाण सीबीडी बेलापूर (नवी मुंबई)**

# पायाच्या भेंगासाठी घरगुती उपाययोजना

बरेच लोक टाचेमध्ये वेदना असल्याची तक्रार करतात. ह्याचे प्रमुख कारण हिल्स घालणे देखील असू शकत. या व्यतिरिक्त टाचेच्या वेदने चे कारण वजन वाढणे, बऱ्याच काळ उभे राहणे, नवीन व्यायाम, किंवा शारीरिक क्रियाकलापांमुळे असू शकत. बऱ्याच वेळा टाचांची वेदना इतकी वाढते की पायाच्या खालच्या भागेत असह्य वेदना आणि जळजळ सुरु होते. जास्त काळ उभे राहणे, पाऊले

कडक होणे, हलकी सूज येणे, टाचेची उंची वाढणे जाणवते. केल्शियम ची कम तरता देखील टाचांच्या वेदनेचे कारण होऊ शकत. कॅल्शियम च्या कमतरतेमुळे हाडांमध्ये वेदना होते. हाडे कमकुवत होतात. टाचांच्या वेदनेपासून मुक्त होण्यासाठी आपण काही घरगुती उपाय अवलंबवू शकता. जे आपल्याला टाचेच्या वेदनेपासून मुक्तता देतात. चला तर मग जाणून घेऊ या.

**आल्याचा काढा** - आलं आरोग्याच्या दृष्टीने खूप फायदेशीर मानले आहे. आलं टाचेच्या वेदनेपासून मुक्त करण्यासाठी देखील उपयुक्त आहे. आल्याचा काढा प्यायल्यानं टाचेच्या वेदनेपासून आणि सूज येण्यापासून आराम मिळतो.

**लवंगाचं तेल**- लवंगाच्या तेलात वेदनाशामक घटक आढळतात. लवंगाच्या तेलाने मॉलिश केल्यानं टाचांच्या वेदनेपासून आराम मिळतो. पायांमध्ये कोणत्याही प्रकारची वेदना जाणविल्यास लवंगाच्या तेलाची मॉलिश केल्यानं फायदा होतो.

**हळदीचा वापर**- हळद ही म साल्याच्या रूपात भाजीची चव वाढविण्यासाठी वापरतात. हळदीमध्ये अँटी इंफ्लिमेंटरी गुणधर्म असतात, जे सूज कमी करण्यासाठी उपयुक्त आहे. हळदीचं दूध प्यायल्यानं शरीराची वेदना कमी होण्यास मुक्तता मिळते.



**मोहरी**- मोहरी चे दाणे तेल बनविण्यासाठी आणि म साल्यात फोडणी देण्यासाठी वापरले जाते. या मुळे टाचांच्या वेदने पासून देखील आराम मिळू शकतो. अर्धा वाटी मोहरी चे दाणे दळून घ्या. ह्या भुकटीला गरम पाण्याच्या बादलीत मिसळा. या पाण्यात पायांना १२ ते १६ मिनिटे घालून ठेवा असं केल्यानं टाचांच्या वेदने पासून

# इस्तंबुल; युरोपात जाण्यासाठीचे द्वार

ग्रीक पुराणकथेतली ट्रॉय सिटी तुर्कस्तानातच तर होती. या सगळ्या ओढ लावणार्या गोष्टींमुळे तुर्कस्तान पर्यटकांच्या मनात अगदी रुतून बसत. इतिहासाच्या पुस्तकात भेटलेलं इस्तंबुल. बझेंटाइन, ग्रीक, रोमन, अरब, ऑटोमान किती जणांची राजवट या शहरानं पाहिली! किती लढ्या या शहरासाठी झाल्या त्याची नोंद इतिहासाच्या पानापानांवर लिहिली गेलेली. सुरुवातीला कॉन्स्टनटिनोपाल आणि मग इस्तंबुल या नावानं अगदी १९२३ तुर्कस्तानची राजधानी म्हणून मि रवणारं हे शहर पर्यटकांना सतत खुणावत राहिलं होतं. आशिया खंडातून युरोप खंडात जाण्यासाठीचं प्रवेशद्वार म्हणून मानाचं स्थान पटकावून बसलेलं हे शहर! इस्तंबुलसाठी अतातुर्क आंतरराष्ट्रीय विम ानतळावर उतरावं लागतं. विमानतळाची भव्यता आणि आधुनिकता डोळ्यात प्रथमक्षणीच भरते. यांत्रिक आधुनिकतेनं परिपूर्ण असलेल्या या विमानतळावर जरी जगभरातून प्रवासी येत असले तरी इथल्या अनेक अधिकार्यांना पुरेसं इंग्रजी येत नव्हतं त्याचा फटका भारतीय पर्यटकांना बसतो. इस्तंबुलचा रस्ता चांगला चौपदरी आणि गुळ्गुळीत होता. त्याला लगटून दूरवर बाग पसरली होती. या उन्हाच्या वेळी तिथे फारसं कुणी नव्हतं, पण बागेतल्या झाडांची हिरवाई दुरूनही नजरेला थंडाई पुरवत होती, शिवाय या बागेला जवळ जवळ खेटून समुद्राची निळाई सोबत असते. टर्किश लिरा हे इथलं चलन. दोन किंवा तीन टर्किश लिरा देऊन तुम्हाला आवडेल त्या प्रमाणात किलगडाच्या फोडी किंवा फळांचे रस विकत घेऊन ते तुम्ही रस्त्यावरच उभे राहून मस्तपैकी फस्त करू शकता. टॅक्सीने काही मिनिटांत इजिप्शियन बाजारात जाऊ शकता. हा बाजार म्हणजे इथलं ओल्ड मार्केट! खूप म्हणजे खूप जुनं. अंदाजे चारशे वर्षांपूर्वीपासून इथे बाजार भरत आलेला आहे. डोक्यावर छप्पर असलेली ही एक पुराणी मंडईच वाटते. आत एक उभा जाणारा आणि एक आडवा जाणारा असे दोन रस्तेदेखील जुन्या मंडईला शोभणारे. रस्त्यांच्या दुतर्फा दुकानं. दुकानांच्या बाहेर झाडून सगळीकडे पोत्यातून अक्रोड, बदाम, पिस्ते अशा वस्तू ठेवलेल्या. त्यादेखील अगदी उगड्यावर. या दुकानांना अगदी खेटून सोन्या-चांदीचे दागिने शोकेसमध्ये विकायला ठेवलेली दुकानंही होती. अत्तराचे सुवासिक बुधले दाखवत गिर्हाईकांना हाकारणारे दुकानदार होते आणि त्याच ओळीत टर्किश डिलाइटचा खच. शोकेसमधून अगदी ऊतू जात असलेली तुर्की मिठाईची दुकानंही होती.

# प्रतिकारशक्ती वाढविण्याचे औषध अद्याप नाहिच...

छोटा अमेय घरी एकटाच असल्यामुळे नोकरीवर असलेल्या आईवडिलांनी त्याला लवकरच; म्हणजे दीड वर्षाचा झाल्या झाल्या प्ले ग्रुपमध्ये टाकलं. आई निशा ऑफिसमध्ये जातानाच सकाळी वाजता अमेयला सोडायची. थेट सायंकाळी घरी परत येताना घेऊन यायची. झालं! अमेय आजारी पडायला लागला. चिडचिड करायला लागला. दोघे माझ्याकडे आले आणि रोगप्रतिकार शक्ती वाढविण्यासाठी औषध मागितलं. रोगप्रतिकार शक्ती वाढविण्याचा असं काही औषध जगात कुठेही मिळत नाही! रोगप्रतिकार शक्तीविषयी पालकांना नेहमी पडणारे हे काही प्रश्न आणि त्यांच्या उत्तरांवर आज चर्चा करूया-

रोगप्रतिकार शक्ती म्हणजे काय?

रोगप्रतिकार शक्ती किंवा इम्युन सिस्टीम ही शरीराला सुरक्षित ठेवण्यासाठी एक यंत्रणा आहे. ही आपल्या शरीराचं वातावरणातील हानिकारक गोष्टींपासून संरक्षण करते. विविध बॅक्टेरिया आपल्या शरीरात शिरकाव करतात, तेव्हा ही यंत्रणा त्यांची ओळख पटवून ते नष्ट करते. विविध आजारांपासून दूर राहण्यासाठी ही यंत्रणा सक्रिय असणं खूप जरुरी आहे.

रोगप्रतिकार शक्ती कोणत्या वयात येते?

बाळ झाल्यावर आईच्या दुधातून बाळाला ॲन्टिबायोटिक्स मिळतात. या ॲलर्जी व संसर्गाशी दोन हात करतात. म्हणूनच आम्ही म्हणतो, जन्म झाल्यावर लगेच स्तनपान सुरू करा व जास्तीत जास्त; म्हणजे दीड वर्ष स्तनपान करा. बाळ साधारण सहा महिन्यांचं झाल्यावर ॲन्टिबायोटिक्स तयार करू शकतं. शरीराची प्रतिकार शक्ती पूर्णतः मूल साधारण आठ वर्षांचं झाल्यावरच तयार होते.

कमकुवत प्रतिकार शक्तीची काय लक्षणं असतात?

प्रतिकार शक्ती कमकुवत असली, तर संसर्ग पुन्हा पुन्हा होतो. जसे न्युमोनिया, ब्रॉन्कायटिस, सायनस इन्फेक्शन, कानाचा संसर्ग, त्वचेचा संसर्ग आदी. अशा मुलांना ॲनेमिया असतो. पचनशक्तीच्या समस्या पुन्हा पुन्हा उद्भवतात. अशा मुलांची शारीरिक वाढ नीट होत नाही.

लसीकरणामुळे मुलांमध्ये रोगप्रतिकार शक्ती निर्माण होते का?

लसीकरणामुळे महाभयंकर संसर्गापासून म ुलांना संरक्षण मिळतं. लस कशी काम करते हे बघण्यासाठी आपण आधी समजून घेऊ की, इन्फ ेन्शन कसं होतं. जेव्हा बॅक्टेरिया किंवा व्हायरस शरीरात जातो, तेव्हा तो पेशींवर आक्रमण करतो. यावेळी त्याची संख्या कित्येक पटींनी वाढते. यालाच संसर्ग म्हटले जाते. संसर्ग झाला की आजार होतो. आता लस दिल्यामुळे काय होतं, की टी-लिम्फोसिट्स आणि ॲन्टिबॉडीज तयार होतात. त्या मग रोगप्रतिकार शक्ती निम ाण करतात. लसीकरण तुमच्या बाळाचा उत्तम हेल्थ इन्शुरन्स आहे.

नेहमीच्या जीवनात कोणत्या गोष्टींचा रोगप्रतिकार शक्तीवर परिणाम होतो?

आजकालच्या धकाधकीच्या जीवनात ताणतणाव, जागरण, अवेळी जेवण या सगळ्या गोष्टी अगदी सामान्य झाल्या आहेत. मात्र या सगळ्यांचा कळत-नकळत मानवी आरोग्यावर दुष्परिणाम होत आहे. माणसाची जीवनशैलीच त्याचं आरोग्य ठरवते. शारीरिक आव्हानांना सामोरं जाण्यासाठी सक्षम रोगप्रतिकार शक्ती असणं फार गरजेचं आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील पादचारी पुलाच्या उभारणीनिमित्त वाहतुकीच्या मार्गात बदल

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील फुट ओव्हर ब्रिजची उभारणीनिमित्ताने अंबड चौफुली-मोतीबाग जाणारा रस्ता रविवार दि.२० ऑक्टोबर रोजी रात्री ९ वाजेपासून ते २१ ऑक्टोबर २०२४ रोजी रात्री १ वाजेपर्यंतच्या वेळेत बंद ठेवण्यात येणार आहे. तरी महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५१ कलम ३६ अन्वये राष्ट्रीय महामार्ग ७५३ वरील अंबड चौफुली-मोतीबाग ते छत्रपती संभाजीनगर चौफुली मार्गावरील वाहतुकीच्या मार्गात बदल करण्यात आला आहे. असे आदेश पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल यांनी जारी केले आहेत. पर्याय मार्ग म्हणून बीड-अंबडकडून येणारी वाहतुक व छत्रपती संभाजीनगरकडे जाणारी वाहतुक ही जालना येथील मंठा चौफुली-नाव्हा चौफुली-देऊळगाव राजा चौफुली- कन्हैयानगर-भोकरदन चौफुली बायपास मार्गे छत्रपती संभाजीनगरकडे जाईल. सदरचे आदेश दि.२० ऑक्टोबर रोजी रात्री ९ वाजेपासून ते २१ ऑक्टोबर २०२४ रोजी १ वाजेपर्यंतच्या कालावधीत पुलाची उभारणी पुर्ण होईपर्यंत लागू राहतील. असेही आदेशात नमुद करण्यात आले आहे.

# अहिल्यादेवी प्राथमिक विद्यालयासाठी अतिशय आनंदाचा व अभिमानाचा क्षण

**जालना । प्रतिनिधी -** हुतात्मा जनार्धन मामा नागपूरकर वादविवाद जालना तालुकास्तरीय स्पर्धेत अहिल्यादेवी प्राथमिक शाळेचा प्रथम क्रमांक आला.त्यामध्ये कुमारी प्रांजल अशोक देवरे व कुमारी अमृता अनिल कांबळे या विद्यार्थीनींनी अतिशय सुंदर सादरीकरण केले. तसेच त्यांना श्रीमती घुले मॅडम व श्रीमती शितल येवले मॅडम यांनी मार्गदर्शन केले. तसेच या विद्यार्थिनींची जिल्हास्तरावर निवड झाली . त्याबद्दल संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती शोभाताई येवले मॅडम संस्थेचे सचिव श्री दिनेश येवले साहेब व शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती इंगळे मॅडम यांनी विद्यार्थ्यांचे खूप खूप अभिनंदन व कौतुक केले.



विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४

# अधिकारी-कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षणासाठी वेळेत उपस्थित रहावे - जिल्हाधिकारी

## प्रशिक्षणास गैरहजर राहणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर होणार कारवाई

**जालना । प्रतिनिधी** - जिल्ह्यात मतदान केंद्राध्यक्ष, प्रथम मतदान अधिकारी आणि इतर मतदान अधिकारी म्हणून ९ हजार ८५५ अधिकारी- कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तरी नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण विधानसभानिहाय पाच ठिकाणी दोन सत्रात सोमवार दि.२१ ऑक्टोबर २०२४ रोजी आयोजित करण्यात आले आहे. तरी नियुक्त केलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षणासाठी वेळेत उपस्थित रहावे, गैरहजर राहणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कारवाई प्रस्तावित करण्यात येईल, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिले आहेत.

जालना जिल्ह्यातील शासकीय व निमशासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालयामधील कार्यरत असलेल्या एकुण १४ हजार ७२० अधिकारी-कर्मचाऱ्यांची माहिती ऑनलाईन पोर्टलवर भरण्यात आली आहे. यामध्ये गट-अ ४२५, गट-ब ८९२, गट-क १२५९० आणि गट-ड ८१३ असे एकुण १४७२० अधिकारी-कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. यापैकी पहिल्या प्रशिक्षणाचे आदेश ९ हजार ८५५ अधिकारी-कर्मचाऱ्यांना संबंधित तहसील कार्यालयाकडून तामिल करण्यात आले आहेत. मतदान केंद्राध्यक्ष, सहाय्यक मतदान केंद्राध्यक्ष आणि मतदान अधिकारी २ व ३ यांच्यासाठी पहिल्या प्रशिक्षणात सोमवार दि.२१ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ९.३० ते दुपारी १ वाजेपर्यंत व दुपारी २ ते ५.३० वाजेपर्यंत राहिल. मतदान अधिकारी २ व ३ यांच्यासाठी सकाळच्या सत्रात प्रत्यक्ष यंत्र हाताळणीचे ज्ञान व दुपारच्या सत्रात प्रशिक्षण देण्यात येईल. तर मतदान केंद्राध्यक्ष, सहाय्यक मतदान केंद्राध्यक्ष यांना सकाळच्या सत्रात प्रशिक्षण व दुपारच्या सत्रात प्रत्यक्ष यंत्र हाताळणीचे ज्ञान देण्यात येईल. अशी माहिती उपजिल्हाधिकारी तथा कर्मचारी व्यवस्थापन समितीच्या नोडल अधिकारी नम्रता चाटे यांनी दिली.



विधानसभा सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रमानुसार जालना जिल्ह्यातील ९९- परतूर, १००-घनसावंगी, १०१-जालना, १०२- बदनापूर (अ.जा.) आणि १०३-भोकरदन या पाच विधानसभा मतदारसंघात बुधवार, दि. २० नोव्हेंबर, २०२४ रोजी मतदान होणार आहे. प्रथम प्रशिक्षण ९९- परतूर विधानसभा मतदारसंघासाठी परतूर येथील भारतरत्न स्व.अटलबिहारी वाजपेयी नाट्यगृहात होणार आहे. १००-घनसावंगी विधानसभा मतदारसंघासाठी घनसावंगी येथील राजेगाव रोडवरील मॉडेल महाविद्यालयात होईल. १०१-जालना विधानसभा मतदारसंघासाठी जालना येथील देऊळगाव राजा रोडवरील सेंन्ट मेरी हायस्कुलमध्ये होईल. १०२- बदनापूर (अ.जा.) विधानसभा मतदारसंघासाठी बदनापूर येथील साक्षी मंगल कार्यालयात होईल. आणि १०३-भोकरदन विधानसभा मतदारसंघासाठी भोकरदन येथील सिल्लोड रोडवरील समृध्दी लॉन्समध्ये आयोजन करण्यात आले आहे. असे उपजिल्हा निवडणूक अधिकारी शशिकांत हदगल यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# धारावी नागरिक समिती आणि झोपडपट्टी पोलीस पंचायतच्या वतीने पोलिसांचे कौतुक!



**धारावी । प्रतिनिधी** - ऑक्टोबर महिन्यातील रमजान ईद पाठोपाठ गणपती, त्यानंतर नवरात्र उत्सव शांततेने व सुरक्षित पार पाडल्याबद्दल व ध्वनी प्रदूषण गर्दीवरील नियंत्रण यापासून नागरिकांना सुटका मिळाल्याबद्दल तसेच धारावी कलानगर येथे तृतीयपंथी करीत असलेल्या व्यवसायावर पोलिसांनी नजर ठेवून योग्य ती कारवाई केल्याबद्दल आणि भविष्यातही धारावीत सर्वसाधारण नागरिक,जेष्ठ नागरिक सुरक्षित रहावे याकरिता व पोलिसाचे मनोबल वाढविण्यासाठी दिनांक १७ नोव्हेंबर २०२४ सायंकाळी सहा वाजता धारावी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक श्री राजू बिडकर साहेब व उपनिरीक्षक श्री संजय कोळी यांची प्रत्यक्ष सदिच्छा भेट घेऊन त्यांनी केलेल्या कामाचे कौतुक करण्यासाठी धारावी नागरिक समिती, झोपडपट्टी पोलीस पंचायत व हॅपिनेस ज्येष्ठ नागरिक संघ यांचे प्राथमिक शिस्त मंडळातील प्रतिनिधी अलका साबळे, गिरीश शेरखाने,गोविंद भोईटे,अशोक काळे,सविता शेरखाने आणि सामाजिक कार्यकर्ते दिलीप गाडेकर यांनी वरिष्ठ पोलीस अधिकारी यांची प्रत्यक्ष भेट घेऊन शाल श्रीफळ व फुलगुच्छ देऊन अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या. त्याचवेळी आभार अभिनंदन व शुभेच्छांचे लेखी पत्र पोलीस बंधूंना देऊन आभार मानले. यापुढेही असे जोमाने काम करून समाजात विश्वास निर्माण होईल,धारावी एकसंघ राहील याकरिता आपण सर्व प्रयत्न करूया.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.